# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** हिंगोली शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0138 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**05/03/2026 19:12

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 27/02/2026
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/03/2026
**Time From (वेळेपासून):** 14:58 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 10:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 05/03/2026 **Time (वेळ):** 18:53 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 016
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/03/2026 18:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** खटकाळी बायपास हिंगोली ,हिंगोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजेश हनमनलु मलपिलु

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपतप्रतिबंधकविभाग हिंगोली,हिंगोली,हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपतप्रतिबंधकविभाग हिंगोली,हिंगोली,हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** पोलीस अधिकारी

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8485070037

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोश बबनराव कढने | | | 1. हमु वदांवन पार्क, लेडी हार्, वाशिम,वाशिम,वाशिम,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 28,000 | 28,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

28,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

सरकार तर्फे फिर्याद ला.प्र.वि.कार्यालय हिंगोली. दिनांक 05/03/2026

मी, राजेश हनमनलु मलपिलु, वय 38 वर्ष, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली मो.नं. 8485070037

सरकार तर्फे फिर्यादी होऊन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन, जुन 2025 पासून पोलीस निरीक्षक म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे नेमणूकीस आहे.

मी दिनांक 24/02/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय हिंगोली येथे हजर असतांना कार्यालयात हजर असलेले तक्रारदार विकास रामराव राठोड, वय 35 वर्ष, व्यवसाय- सह शिक्षक, मधोमती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय लाख ता. औढा ना. जि.हिंगोली, सध्या प्रतिनियुक्ती - भारतरत्न स्व.राजीव गांधी विद्यालय कोंदुर ता.कळमनुरी, रा.दक्षता कॉलनी ता.जि.हिंगोली यांनी आमच्याकडे लेखी तक्रार दिली की, मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, हिंगोली येथे येवून लेखी तक्रार देतो की, मी वरील ठिकाणचा राहणार आहे. माझे बि.ए.,बि.एड.,एम.ए. पर्यतचे शिक्षण झालेले असुन मी महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ संस्था लाख व्दारा संचलित मधोमती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय लाख ता. औढा जि.हिंगोली, येथे सन 2017 पासुन सह शिक्षक म्हणुन कार्यरत आहे. व सध्या प्रतिनियुक्तीवर संस्थे अंतर्गत असलेली शाळा भारतरत्न स्व. राजीव गांधी विद्यालय, कोंढुर (डिग्रस) ता. कळमनुरी येथे मागिल 15 महिन्यापासुन कार्यरत आहे. माझी मुळ नेमणुक मधोमती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय लाख येथीलच असल्याने माझा नियमित पगार व इतर भत्ते हे सदर शाळेतुन मिळत असतात.

श्री.संतोष बबनराव कढणे हे मधोमती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय लाख ता. औढा जि.हिंगोली, येथे मुख्याध्यापक म्हणुन कार्यरत आहेत. आम्हा सर्व शिक्षकांना दर महा घरभाडे भत्ता पगारमध्ये मिळत असतो. मला माहे-मार्च/2025 ते जुन/2025 पर्यत 04 महिण्याचे दरमहा 4,750/-रू. प्रमाणे एकुण 19,000/- रूपये तसेच जुलै/2025 ते फेब्रुर/2026 पर्यत 08 महिन्याचा दरमहा 4,890/-रू. प्रमाणे 39,120/-रू. असा वार्षीक एकुण 58,120/-रू. घरभाडे भत्ता पगारामध्ये मिळाला आहे.

मुख्याध्यापक श्री.संतोश कढणे यांनी मला तुम्ही मुख्यालयात राहत नाहीत म्हणुन शिक्षणाधिकारी माध्यमिक यांना अहवाल पाठवुन तुम्हाला पगार मध्ये मिळणारा घरभाडे भत्ता बंद करेल म्हणुन मिळालेल्या वार्षीक घरभाडे भत्ता रक्कमेच्या पन्नास टक्के रक्कम दयावी लागेल म्हणुन माझेकडे मला मिळालेल्या वार्षीक घरभाडे भत्याच्या पन्नास टक्के रक्कम 29,060/- रु. लाचेची मागणी केली आहे.

मी मागील वर्षी त्यांना पैसे दिले नाहीत; त्यामुळे मला त्रास व्हावा म्हणुन, त्यांनी माझी जाणीवपुर्वक आमच्या संस्थेच्या भारतरत्न स्व.राजीव गांधी विद्यालय कोढुर ता.कळमनुरी या विद्यालयात प्रतिनियुक्ती केली आहे.

मुख्याध्यापक श्री.संतोश बबनराव कढणे हे मला मागत असलेली घरभाडे भत्याची पन्नास टक्के रक्कम लाच असल्याची माझी खात्री झाली आहे. त्यांना लाच देण्याची माझी अजीबात ईच्छा नाही. परंतु, मुख्याध्यापक श्री. संतोश बबनराव कढणे यांना मी पैसे दिले नाही तर, ते मला घरभाडे भत्ता मिळु देणार नाहीत व माझ्या संबधीत इतर कामात अडथळा निर्माण करतील. त्यामुळे माझे आर्थिक व मानसिक नुकसान होईल, म्हणुन मी नाईलाजास्तव त्यांना लाच देण्यास होकार दिला आहे. त्यांना लाच म्हणुन देण्यासाठी 29,060/- रू. मी माझे बचतीतुन सोबत आणलेली आहे. मुख्याध्यापक श्री.संतोश बबनराव कढणे यांनी किंवा त्यांचे मार्फतीने इतर कोणी माझे कामासाठी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही होणेस विनंती आहे., अशा आशयाची तक्रार दिली होती. सदरचे तक्रारी वरुन कारवाईचे अनुषंगाने तालुका कृषी अधिकारी, हिंगोली यांना दिलेल्या लेखी पत्रकान्वये त्यांनी त्यांचे कार्यालयाचे पंच 1) विलास गंगाधर गिरी, वय 38 वर्ष, पद- सहायक कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय हिंगोली 2) प्रकाश नामदेव मनवर, वय 50 वर्ष पद- कृषी अधिकारी, सदरचे तक्रारी वरुन कारवाईचे अनुशंगाने तालुका कृर्षी अधिकारी कार्यालय हिंगोली असे ला.प्र.वि.हिंगोली कार्यालयात हजर

आले.

दि.24/02/2026 रोजी लाप्रवि कार्यालय हिंगोली येथे तक्रारदार व वर नमुद दोन्ही पंच हजर असताना यातील तक्रारदार यांनी त्यांची तक्रार पंचासमक्ष तोंडी कथन केली.त्यानंतर सदरची तक्रार तक्रारदार यांनी त्यांचे स्वत:चे हस्ताक्षरात लिहुन दिली असुन तक्रारदार यांनी दिलेली तक्रार पंचानी वाचुन पाहिली.तक्रारदार यांची तोंडी कथन केलेली तक्रार व लेखी तक्रार एकच असल्याचे खात्री झाल्याने त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या.

त्यानंतर शासकीय पंचा समक्ष तक्रारदार विकास राठोड यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 8999469247 हया क्रमांकावरुन लोकसेवक कढणे, मुख्याध्यापक यांना त्यांचा मोबाईल क्रमांक 7020252329 हया क्रमांकावर कॉल करून त्यांचा ठाव ठिकाणा घेतला असता लोकसेवक कढणे, मुख्याध्यापक हे वाशिम येथे असल्याचे व दिनांक 26/02/2026 रोजी हिंगोलीला येणार असल्याचे समजले वरुन दि.26.02.2026 रोजी त्यांची भेट घेवुन त्यांच्या कामा विशयी बोलणी करणार असल्याचे तक्रारदार यांनी सांगीतले होते त्याबाबत सविस्तर तक्रार पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दि.26/02/2026 रोजी तक्रारदार विकास राठोड हे लाप्रवि कार्यालयात हजर आले. त्यांनी लोकसेवक कढणे, मुख्याध्यापक यांचा ठाव ठिकाणा घेतला असता लोकसेवक कढणे, मुख्याध्यापक हे मधोमती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय लाख ता. औंढा ना. या शाळेवरुन अचानक निघुन गेले असल्याने त्यांची आज भेट होणार नाही सांगीतले. दि.27/02/2026 रोजी तक्रारदार राठोड यांनी लोकसेवक कढणे मुख्याध्यापक यांचा ठाव ठिकाणा घेवुन ला.प्र.वि.कार्यालय हिंगोली येथे आल्यानंतर तक्रार पडताळणी कारवाई करण्याचे ठरले होते.

त्यानंतर दि.27/02/2026 रोजी तक्रारदार विकास राठोड हे लाप्रवि कार्यालय, हिंगोली येथे हजर आले असता नमुद दोन्ही शासकिय पंचा समक्ष करण्यात आलेल्या तक्रार पडताळणी कारवाई दरम्यान त्यांनी लोकसेवक कढणे मुख्याध्यापक यांना फोनव्दारे संपर्क करून ठाव ठिकाणा घेतला. त्यांनी तक्रारदार यांना हिंगोली नांदेड रोडवरील, खटकाळी बायपास हिंगोली येथे भेट घेण्यास बोलविले होते.

त्यावरून आमच्या सुचनेवरून पोशि श्री पुंडगे यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना व्हॉईस रेकॉर्डर बाबत व त्यामध्ये वापरण्यात येणाऱ्या मेमरीकार्ड बाबत माहिती दिली. त्यानंतर अंदाजे 14.58 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून तक्रारदार श्री विकास राठोड यांचे अंगातील बनियनच्या आतील बाजुस कापडी पिशवीत टाकुन आडकवुन देवुन, तक्रारदार राठोड व पंच क्र.1 श्री गिरी यांना लोकसेवक कढणे यांची खटकाळी बायपास हिंगोली येथे भेट घेण्याकरीता तक्रारदार यांचे चारचाकी एरटीगा वाहन क्र. एम.एच.38 एडी 4555 ने ला.प्र.वि.कार्यालय, हिंगोली येथुन रवाना केले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार विकास राठोड व पंच क्र. 01 गिरी असे तक्रारदार यांचेकडील चार चाकी वाहनाने खटकाळी बायपास हिंगोली येथे गेले, तेथुन तक्रारदार यांनी मुख्याध्यापक कढणे यांना फोन केला असता, मुख्याध्यापक कढणे यांनी त्यांना वाशिम रोडवरील माळहिवरा येथे येण्यास सांगीतले. तेथुन तक्रारदार यांनी लोकसेवक कढणे यांना फोन केला असता, त्यांना कन्हेरगावात शेवटी एम.डी. बार येथे ये असे सांगितले. त्यावरून तक्रारदार व पंच क्र.01 असे कन्हेरगाव नाका येथील एम.डी.बार येथे गेले.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 हे पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले, तेव्हा पोशि श्री पुंडगे यांनी तक्रारदार विकास राठोड यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर अंदाजे 16.36 वा. बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर तक्रारदार श्री विकास राठोड व पंच क्र.1 गिरी यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यावेळी पंच क्र. 1 श्री गिरी यांनी सांगितले की, तक्रारदार व लोकसेवक कढणे यांची कन्हेरगाव येथील एम.डी.बारमध्ये भेट घेतली. तक्रारदार यांच्या कामासंबधाने बोलणे झाले त्या भेटी दरम्यान लोकसेवक कढणे, मुख्याध्यापक हे तक्रारदार विकास राठोड यांना म्हणाले की, चार हजार आठशे नव्वद गुनीला बारा... किती झाले विचारले असता तकाररदार राठोड त्यांना अठाव्वन हजार सहाशे ऐंशी म्हणाले त्यांच्यापैकी किती दयाचे असे तक्रारदार म्हणाले असता, लोकसेवक कढणे त्यांना म्हणाले एकोणतीस... तीनशे चाळीस. असे म्हणुन लोकांनी अठाविस दिले असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार त्यांना म्हणाले मग मला किती दयाचे भाउ तेव्हा लोकसेवक कढणे यांनी तेवढेच....अठावीस म्हणुन तक्रारदार राठोड यांचेकडे 28,000/-रू. लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झाले. त्याबाबत पंचासमक्ष सविस्तर तक्रार पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर दिनांक 05/03/2026 रोजी 10.00 वाजता तक्रारदार राठोड हे ला.प्र.वि. कार्यालय, हिंगोली येथे हजर आले, पंचा समक्ष तक्रारदार राठोड यांनी तक्रार देते वेळी आमच्याकडे जमा केलेली 29,060/- रु. रक्कमे पैकी सापळा कारवाईकामी 28,000/- रू लाच रक्कम ताब्यात घेवुन उर्वरीत रक्कम तक्रारदार राठोड यांना परत करण्यात आली आहे.

त्यानंतर तक्रारदार यांच्या सांगण्याप्रमाणे लोकसेवक कढणे, मुख्याध्यापक यांची खटकाळी बायपास हिंगोली येथे

भेट होईल असे सांगितल्याने लोकसेवक कढणे यांच्या विरुध्द खटकाळी बायपास हिंगोली येथे सापळा कारवाई आजमावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर ला.प्र.वि.कार्यालयात आमच्या कक्षामध्ये सापळा पुर्व कारवाईला सुरवात केली. सपोउपनि मोहम्मद युनुस यांनी तक्रारदार व दोन्ही पंचासमक्ष अँन्थ्राँसिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट लॅम्पच्या गुणधर्माबाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईच्या अनुशंगाने तक्रारदार, पंच व सापळा पथकातील अंमलदाराना सुचना दिल्या. लोकसेवक कढणे यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारल्याबाबत इशारा म्हणुन त्यांचा डोळ्यावरील चश्मा काढने बाबत तक्रारदार यांना सुचना दिली. त्यानंतर सपोउपनि मोहम्मद युनूस यांनी लाच रक्कमेला अँन्थ्राँसिन पावडर लावुन तक्रारदार यांच्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात अलगत ठेवुन दिल्या.
त्यानंतर तक्रारदार यांच्याकडे 10.36 वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पंच क्र. 1 यांच्यासोबत लोकसेवक कढणे यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचेकडील मोटार सायकल क्र. एमएच 38 एडी 3755 ने खटकाळी बायपास हिंगोली येथे रवाना केले. त्यांच्या पाठोपाठ काही अंतराने आम्ही व सापळा पथकातील पो.नि. राजेश मलपिलु, पोह श्री फुपाटे, पोशि श्री. पुंडगे व पंच क्रं.2 श्री मनवर असे शासकिय वाहन क्र. एम.एच.33 सि 279 ने व पोह श्री. वरणे व पोशि/ श्री वाघ हे शासकिय मोटार सायकलने हिंगोली ते नांदेड रोडवरील खटकाळी बायपास हिंगोलीकडे रवाना झालो. तेथे गेल्यावर तक्रारदार व पंच क्रमांक 1 श्री गिरी हे तक्रारदार यांचे मोटार सायकलच्या खाली उतरले. त्यावेळी आम्ही व सापळा पथकातील अंमलदार असे खटकाळी बायपास चैफुली येथे शासकिय वाहन व शासकिय मोटार सायकल बाजुस लावुन तिथे कोणासही संषय येणार नाही अशा प्रकारे सापळा लावला.
थोडया वेळाने अंदाजे 10.50 वाजता तक्रारदार यांच्याकडुन लोकसेवक संतोश कढणे यांनी पंचासमक्ष स्वतः 28,000/- रु. लाच रक्कम स्विकारली असता, तक्रारदार यांनी त्यांना सांगीतल्याप्रमाणे लाच स्विकारल्या बाबत त्यांचा डोळ्यावरील चश्मा काढुन सापळा प्रथकास इशारा केला. त्यावेळी आम्ही, लोकसेवक, संतोश कढणे यांना हिंगोली ते नांदेड जाणारे रोडवरील आयान पान सेंटर समोर ताब्यात घेतले. त्यावेळी सापळा पथकातील पोशि/ पुंडगे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर आम्ही आमचा, पंचाचा व सापळा पथकातील सदस्याचा परिचय देवुन लोकसेवक कढणे यांना त्यांचा नाव, गाव पत्ता विचारला असता त्यांनी संतोश बबनराव कढणे, वय 44 वर्ष, पद - मुख्याध्यापक, मधोमती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लाख ता. औंढा ना. जि.हिंगोली, रा. वृदांवन पार्क, लेडी हार्डींग रोड, गजानन महाराज मंदिरा शेजारी, वाशिम ता.जि.वाशिम असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारपुस केली असता त्यांनी स्विकारलेली अँन्थ्राँसिन पावडर युक्त 28,000/- रु लाच रक्कम त्यांचे पॅटच्या डाव्या खिशातुन काढुन दिल्याने ती पंचा समक्ष हस्तगत करण्यात आली आहे. सदर बाबत सविस्तर सापळा कारवाई पंचनामा करण्यात आलेला आहे.
तरी तक्रारदार श्री. विकास रामराव राठोड, वय 35 वर्श, व्यवसाय- सह शिक्षक, मधोमती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय लाख ता.औंढा जि.हिंगोली, सध्या. प्रतिनियुक्ती - भारतरत्न स्व.राजीव गांधी विद्यालय कोंढुर ता.कळमनुरी, रा.दक्षता कॉलनी ता.जि.हिंगोली यांनी दिनांक 24/02/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे दिलेल्या तक्रारीवरुन, दिनांक 27/02/2026 रोजी करण्यात आलेला पडताळणी पचंनामा व दि. 05/03/2026 रोजी केलेल्या सापळा पुर्व व सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक, संतोश बबनराव कढणे, वय 44 वर्ष, पद - मुख्याध्यापक, मधोमती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लाख ता. औंढा ना. जि.हिंगोली रा. वृदांवन पार्क, लेडी हार्डींग रोड, गजानन महाराज मंदिरा शेजारी वाशिम ता.जि.वाशिम यांनी तक्रारदार विकास राठोड यांना मिळालेल्या घरभाडे भत्याच्या रक्कमेच्या पन्नास टक्के रक्कमेपैकी 28,000/- रु. लाचेची मागणी करून, आज दिनांक 05/03/2026 रोजी 10.50 वा.चे सुमारास सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार राठोड यांच्याकडुन हिंगोली ते नांदेड जाणारे रोडवरील आयान पान सेंटर समोर 28,000/- रु लाच रक्कम पंचा समक्ष स्वतः स्विकारली आहे.
आरोपी लोकसेवक, संतोश बबनराव कढणे, वय 44 वर्ष, पद - मुख्याध्यापक, मधोमती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लाख ता. औंढा ना. जि.हिंगोली रा. वृदांवन पार्क, लेडी हार्डींग रोड, गजानन महाराज मंदिरा शेजारी वाशिम ता.जि.वाशिम यांनी तक्रारदार विकास राठोड यांच्याकडुन स्वताः लाच रक्कम स्विकारली म्हणुन त्यांचे विरुध्द कलम 7 भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेषिर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

(राजेश मलपिलु)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,हिंगोली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
VIKAS MAROTI GANWAT
**Rank (पद):** Dy. SP (Deputy Superintendant **No.(क्र.):** DGPVMGM8101
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.** (आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** SANDEEP KHANDER.
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.हिंगोली (श.)